मानसिक आरोग्य अधिनियम-२०१७ अंतर्गत राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावर नवीन अशासकीय सदस्य नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः माआका-१३२६/प्र.क्र. ०१/असंसर्ग-१ (ई-१५१७२८०)
१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २४ जुलै, २०२६

वाचा :-

(१) केंद्रीय मानसिक आरोग्य कायदा-२०१७ दि.०७.०४.२०१७.
(२) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन अधिसूचना दि.०१ नोव्हेंबर,२०१८.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२२०/आरोग्य ३अ, दि.०६.०९.२०२२.
(४) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश क्र.माआका-१३२६/प्र.क्र.०१/असंसर्ग-१, दि.१२.०६.२०२६.
(५) अतिरिक्त संचालक, (आरोग्य संस्थेमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.यांचे पत्र क्र.आआसे/रामाआप्रा/टे-४/प्राधिकरण/सदस्य/७७३३-३५/२६, दि.२१.०७.२०२६.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाने मानसिक अधिनियम,२०१७ लागू केला असून त्या अंतर्गत वाचा मधील अ.क्र.२ येथील दि. ०१.११.२०१८ च्या अधिसूचनेनुसार राज्यामध्ये राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण गठीत करण्यात आले आहे. तसेच वाचा मधील अ.क्र.३ येथील दि. ०६.०९.२०२२ शासन निर्णयान्वये, राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावर नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावरील नामनिर्देशित सदस्यांची मुदत ०३ वर्षाकरिता होती. सदर मुदत संपुष्टात आल्याने नवीन अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्याकरिता जाहिरातीद्वारे प्राप्त झालेल्या अर्जांमधून अशासकीय सदस्यांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. २९.०५.२०१८ च्या अधिसूचनेतील कलम ०७ नुसार मा. अध्यक्ष, राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण तथा प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली वाचा मधील अ.क्र.४ येथील दि. १२.०६.२०२६ च्या शासन आदेशान्वये निवड समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीद्वारे अशासकीय सदस्यांची मुलाखतीद्वारे निवड करण्याकरिता पात्र उमेदवारांची दि. १९.०६.२०२६ रोजी मुलाखत पार पडली. मानसिक आरोग्य कायदा-२०१७ मधील तरतुदीनुसार मुलाखतीअंती निवड समितीने ११ अशासकीय सदस्यांची निवड केलेली आहे. या अनुषंगाने मानसिक आरोग्य अधिनियम, २०१७ च्या खंड ४६ (१) नुसार राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावरील शासकीय व अशासकीय सदस्यांची एकत्रित नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

मानसिक आरोग्य अधिनियम २०१७ च्या खंड ४६ (१) नुसार राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावरील शासकीय व अशासकीय सदस्यांची नियुक्ती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

अ.क्र.	मानसिक आरोग्य अधिनियम - २०१७ मधील तरतूदीनुसार राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणाची रचना	पदनाम
१	राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(a)	पदसिद्ध अध्यक्ष
२	राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे संबंधित सह/उपसचिव Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(b)	पदसिद्ध सदस्य
३	संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(c)	पदसिद्ध सदस्य
४	राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे सह/उपसचिव Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(d)	पदसिद्ध सदस्य
५	राज्य शासनाच्या संबंधित इतर विभागाचे पदसिद्ध प्रतिनिधी Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(e)	
	१. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई	पदसिद्ध सदस्य
	२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई	पदसिद्ध सदस्य
	३. मनोविकृती विभाग प्रमुख, सर जे.जे. वैद्यकीय विद्यालय, मुंबई	पदसिद्ध सदस्य
	४. अतिरिक्त संचालक (आरोग्य संस्थांमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई	पदसिद्ध सदस्य सचिव
६	शासन नामनिर्देशित - राज्यातील मनोरुग्णालयाचे प्रमुख किंवा कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयाच्या मनोविकृती विभागाचा प्रमुख Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(f)	वैद्यकीय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे, सदस्य
७	शासन नामनिर्देशित - राज्य शासनाच्या सेवेत नसलेला राज्यातील एक नामांकित मानसोपचार तज्ञ Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(g)	डॉ.मिलन हिमदीप बाळकृष्णन
८	शासन नामनिर्देशित - मानसिक आरोग्य अधिनियम - २०१७ मधील खंड (२) च्या उपखंड (१) मधील (Q) (iii) मध्ये नमुद केल्याप्रमाणे किमान १५ वर्षाचा अनुभव असलेला एक मानसिक आरोग्य व्यावसायिक Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(h)	प्रो.हिरामन निवृत्ती वारुंगसे
९	शासन नामनिर्देशित - मानसिक आरोग्य क्षेत्रामध्ये १५ वर्षे अनुभव असलेले मानसिक सामाजिक कार्यकर्ता Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(i)	श्री.चेतन साऊबा दिवाण
१०	शासन नामनिर्देशित - मानसिक आरोग्य क्षेत्रामध्ये किमान १५ वर्षे अनुभव असलेले एक वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(j)	श्रीम.रुपा जी.चौबल
११	शासन नामनिर्देशित - मानसिक आजार क्षेत्रामध्ये किमान १५ वर्षे अनुभव असलेले एक मानसिक आरोग्य परिचारिका Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(k)	श्रीम.अनुराधा अजितकुमार बिडवे

१२	शासन नामनिर्देशित - ज्यांना मानसिक आजार झाला आहे किंवा झाला होता, अशा व्यक्तींचे प्रतिनिधित्व करणारे दोन व्यक्ती Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(l)	१.डॉ. ऋचा अरुण शेटे २. श्रीम.अकीला महेश्वरी
१३	शासन नामनिर्देशित - मानसिक आजार असलेल्या व्यक्तीची काळजी घेणा-या व्यक्ती/संस्था प्रतिनिधित्व करणारे दोन व्यक्ती Mental Health Care Act, 2017 Section 46(1) (m)	१.श्रीम.सरस्वती सुरेश २.डॉ.किरण प्रकाश चव्हाण
१४	शासन नामनिर्देशित - मनोरुग्णांना सेवा देणारी अशासकीय संस्थांचे प्रतिनिधीत्व करणा-या दोन व्यक्ती. Mental Health Care Act, 2017 Section 46(1)(n)	१.श्री.विजय राघवन २.श्री.शीबू अल्बर्ट

२. मानसिक आजार झाला आहे किंवा झाला होता अशा व्यक्तींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीमध्ये श्रीमती इरा खान यांना मानसिक आरोग्य प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीस विशेष निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित असतील तसेच सदरहू नामनिर्देशित सदस्यांचा कार्यकाळ हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ०३ वर्षासाठी अथवा त्यांच्या वयाची ७० वर्ष यापैकी जे अगोदर घडेल इतका असेल.

३. राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणाचे सदस्य यांचे अधिकार व कार्ये तसेच पदावधी इत्यादी बाबी ह्या राज्य मानसिक आरोग्य अधिनियम २०१७ मधील खंड ४७ (०१) व ५५ मधील तरतूदीनुसार असतील. तसेच सदर प्राधिकरणावरील अशासकीय सदस्यांना शासनाच्या नियमानुसार बैठक भत्ता, प्रवास भत्ता व अन्य भत्ते अनुज्ञेय राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२४१६०६०१८११७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by RAJASHREE RAHUL SARANG
Date: 2026.07.24 17:57:32 +05'30'

(राजश्री सारंग)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६) महालेखापाल, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/ २, मुंबई/नागपूर.
७) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
८) सहसचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
९) सहसचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.

१०) सहसचिव,दिव्यांग कल्याण,महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
११) सहसचिव, महिला व बालविकास,महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
१२) सहसचिव, आदिवासी विकास विभाग,महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
१३) सहसचिव,अन्न व औषध प्रशासन विभाग,महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.
१४) सहसचिव,गृह विभाग,महाराष्ट्र राज्य राज्य मंत्रालय, मुंबई.
१५) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य मानसिक प्राधिकरण, मुंबई.
१७) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१८) मनोविकृती विभाग प्रमुख, सर जे. जे. वैद्यकिय विद्यालय, मुंबई.
१९) सर्व संबधित नामनिर्देशित सदस्य मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण, मुंबई. तथा अतिरिक्त संचालक (आरोग्य संस्थांमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम), आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई यांचेमार्फत
२०) निवडनस्ती (असंसर्ग-१).